स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 05–06–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 10. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 11. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 13. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 14. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 15. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 16. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

### उपस्थित अधिकारी

1. श्री. शंतनू गोयल, अति. आयुक्त (2)
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 107:–** प्रभाग क्र. १३ अंबाझरी ले–आऊट येथे सी.सी. पेव्हमेंटचे
**{लोककर्म विभाग}** बांधकाम करणे रूपये २६३८७२३/– चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, सायली कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा १४.५४ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २२५४९९९.९० /– ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 108:–** प्रभाग क्र. 33 (क) अंतर्गत पार्वतीनगर येथील सिमेंट
**{स्लम विभाग}** कॉक्रीटचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण 03 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 16 % टक्के कमीवर असलेली रूपये 41,97,050/– (रूपये एकेचाळीस लक्ष, सत्त्यान्नव हजार पन्नास फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.

**ठराव क्रमांक 109:—** प्रभाग क्र. 33 (क) अंतर्गत पार्वतीनगर व आंबेडकर नगर
**{स्लम विभाग}** येथील सिमेंट कॉंक्रीटचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त एकूण 04 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरांपेक्षा 15.51 टक्के कमी दर असलेली रु. 42,23,249/— ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.

**ठराव क्रमांक 110:—** प्रभाग क्र. ३३ अविनाश प्ले—ग्राऊंड ते पार्वती नगर
**{लोककर्म विभाग}** नाल्यापर्यंत आर.सी.सी.पावसाळी लाईन टाकणे रूपये २८२५९८१/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, दिप कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा १५.०१ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २४०१८०१.२५/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 111:—** नागपूर वाहतुक पोलीस व नागपूर महानगरपालिका यांचे
**{वाहतूक विभाग}** संयुक्तरित्या वाहतुकीच्या कोंडीचे निवारण करण्याकरिता नागपूर शहरामध्ये अनाधिकृत पार्कीग करणाऱ्या वाहनांना उचलण्याकरिता संरचना, बांधा, वापरा व देखभाल करा (DBOM) या धर्तीवर टोवींग व्हॅनची पध्दती खालील अटी व शर्ती अमलात आणण्याचा व त्यानुसार निविदा बोलविण्यास, मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

अटी व शर्ती :—

1) कमीत कमी वेळेकरीता जी यंत्रणा/निवीदाकार टोवींग मशीन सिस्टीम उपलब्ध करेल त्या निविदाकारास पात्र निविदाकार ठरविण्यात येईल.
2) टोवींग शुल्क चार चाकी वाहनाकरिता प्रत्येकी रू. 400/— व दोन चाकी वाहनाकरीताप्रत्येकी रू. 200/— (GST वगळून) वसूल करणे.
3) प्रत्येक वर्षाकरिता टोवींग शुल्कामध्ये 5% वाढ करणे.
4) महानगरपालिकेच्या रस्त्यावर / जागेवर अनधिकृत पार्किग करण्यात आलेल्या वाहनांवरील लावण्यात आलेल्या दंडाच्या वसूलीतून 10% रक्कम ही नागपूर महानगरपालिकेस देय राहील.
5) पात्र कंत्राटदार हे Digital Payment व्दारे दंड वसूल करतील.
6) नागपूर वाहतुक पोलीस दंड वसूली केंद्र उभारतील व यशस्वी एजन्सी दररोज ही वसूली भरतील व वसूलीतून टोवींग चार्जेस एजन्सीला देण्यात येईल.
7) उचलण्यात येणारी वाहने पार्क करण्याकरीता वाहनतळे नागपूर शहर पोलीस व नागपूर महानगरपालिका यांचे मार्फत ठरवून ती वाहनतळे कंत्राटदारास देण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 112:—** नागपूर शहराच्या विकास योजना आराखडयानुसार मौजा
**{कार्य. अभि. डी.पी.रोड}** नागपूर जूना भंडारा रोड मेयो हॉस्पीटल चौक ते सुनील हॉटेल पर्यंत डि.पी. रोड विकसीत करण्याकरिता नगर भुमापन विभाग क्र. 1 नागपूर यांचे कडील मोजणी शुल्काचा भरणा करण्याकरिता रु. 29,46,000/— रकमेच्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 113:—** प्रभाग क्र. ३७ नाईक ले आऊट येथे आय ब्लॉक लावणे
**{लोककर्म विभाग}** रूपये २९८२००६/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, सायली कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा १४.३४ टक्के प्रमाणे कमी

दराची रूपये २५५४४४५.९८/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 114:— {जलप्रदाय} उन्हाळा 2018 — तातडीची पाणी पुरवठा योजना अंतर्गत नागपूर शहरातील जलवाहिन्यांचे जाळे असलेल्या/नसलेल्या भागातील पाणी टंचाई वस्त्यांमध्ये 115 मी.मी. व 150 मी.मी. व्यासाच्या एकूण 347 विंधन विहिरी खोदण्याचा कार्यक्रम राबविणे संदर्भात खालील प्रस्तावाबाबत यथा योग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, .

1. निविदेमध्ये प्राप्त निम्नतम दर प्राकलनीय दरापेक्षा 0.20% कमी आहे. या दराला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. निम्नतम दरावर काम करण्यास तयार असलेले निविदाकार मे. निशा बोअरवेल, मे. तिरुमला ड्रीलर्स, मे. आशिष बोअरवेल व मे. हिंद बोअरवेल या चार कंत्राटदारांना कामे वाटून देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. या कामाची मुळ प्राकलनीय किंमत रु. 3,56,16,317/— एवढी असून निम्नतम निविदा दराची एकूण रु. 3,55,45,084/— खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 115:— {लोककर्म विभाग} प्रभाग क्र. ३६ गोविंद नगर, भैय्यालाल वाडी पावसाळी पाण्याचे नाली व आय ब्लॉक लावणे रूपये ४०६२७४९/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, विशणदास नानंकराम खत्री यांची प्राकलनिय दरापेक्षा १४.७५ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ३४६३४९३.५२/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 116:— {प्रवर्तन विभाग} दिनांक 22.02.2018 मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेतील निर्देशान्वये प्रवर्तन विभागामार्फत अतिक्रमण निर्मुलन कारवाईमध्ये तसेच इतर क्षेत्रीय कार्यालयाकडून खराब/निकामी साहित्य प्रवर्तन विभागाचे 118 बटालीयन, सिताबडी किल्ला येथे ठेवण्यात आलेले आहे. जप्त केलेले साहित्य मोडतोड, नादुरूस्त व कालबाहय झाल्यामुळे काही साहित्य जसे, तूटलेले हाथठेले, लोखंडी टिनपत्रे, ॲगल्स, ॲडबोर्ड/फ्लेक्स बोर्ड, इत्यादी साहित्य (अंदाजे किंमत रू. 8,11,170/—) 118 बटालीयन, सिताबडी किल्ला ठेवण्यात आले आहे.

मा. आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशान्वये साहित्याची निर्लेखित किंमत ठरवायची असल्यामुळे भंगार साहित्याचे मुल्यांकन करण्यास या क्षेत्रात कार्यरत संस्थेस मे. एम. जी.चांडक, सुभाष रोड, नागपूर यांचेमार्फत प्राप्त प्राकलनामध्ये नमुद निर्लेखित किंमत ठरविण्याकरीता रू. 82,600/— चे प्रकलन प्राप्त झालेले असून तसेच श्री. संजय बंदुणी, मुख्य प्रबंधक, एम. एस. टी. सी. लिमिटेड यांचेकडून प्राप्त पत्रान्वये संपुर्ण मालाचा लॉट तयार करून व लॉटव्दारे लिलाव करणे व लिलावाचे प्राप्त रक्कमेवर 2.5% सर्विस चार्ज आकारण्याचे नमुद आहे.

करीता अतिक्रमणधारकांकडून जप्त केलेले भंगार साहित्याचे (लोखंडी साहित्य, टिन, प्लास्टीक साहित्य व लाकडी साहित्य) याप्रकारे विभागणी करून प्रति किलो प्रति दर याप्रमाणे लिलाव प्रक्रियेव्दारे विल्हेवाट लावण्याचे प्रस्ताव मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन जाहीर लिलावा द्वारे करण्यात यावे या सुचनेसह समितीने विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 117:— {उद्यान विभाग} अंबाझरी तलावात 3 वर्ष कालावधीकरिता मत्स्यव्यवसाय करण्याचा कंत्राट देण्याकरिता प्रशासकिय मान्यता प्रदान

करणे तसेच निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 118ः—</u>** नागपूर महानगरपालिका, समाज कल्याण विभागामार्फत
**{समाजकल्याण विभाग}** ''अंत्योदय योजना''अंतर्गत बेरोजगार दिव्यांगाना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने दिव्यांग व्यक्तींकरिता ई—रिक्षा वाटपासंदर्भात आवश्यक अटी व शर्तीनुसार लाभार्थी निवडावयाचा तसेच ई—रिक्षा वाटपाच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, (दुसरा टप्पा)

'अंत्योदय योजना'' अंतर्गत दिव्यांग व्यक्तीकरिता ई—रिक्षा वाटपासंदर्भात अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.

<u>अटि व शर्ती</u>

1. अर्जदाराचे 40 टक्के व त्यापेक्षा जास्त अस्थिव्यंग अपंगत्व असल्याचे (कमरे खालील) शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे अपंग प्रमाणपत्र असने बंधनकारक आहे. त्यामध्ये ई—रिक्षा चालविण्याकरिता हात, डोळे, कान सक्षम असावे.
2. अर्जदाराने शासकीय, निमशासकीय व इतर संस्थेव्दारे ई—रिक्षा वाटप योजनेचा लाभ घेतले नसल्याचे रू. 100/— स्टॅम्प पेपरवर हमीपत्र देणे बंधणकारक राहील.
3. कुटुंबातील एका पेक्षा जास्त व्यक्तींना सदर योजनेचा लाभ देता येणार नाही.
4. अर्जदाराने 1 लाख पर्यंत वार्षीक उत्पन्न दाखला सादर करणे बंधनकारक आहे.
5. अर्जदाराकडे ई—रिक्षा चालविण्याची वैध अनुज्ञप्ती व सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याचे प्राधिकारपत्र/बॅज आणि लॅमिनेटड स्वरूपातील ओळखपत्र असावे.
6. अर्जदारास स्थानिक भाषेचे ज्ञान व परवाना क्षेत्रातील स्थळांची माहिती असावी.
7. अर्जदाराविरूध्द मागील 1 वर्षामध्ये कोणत्याही प्रकारचा दखलपात्र गुन्हा नोंद झाला नसल्याचा पोलीस विभागाचा दाखला.
8. अर्जदार किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांपैकी शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी कंपनीमध्ये कायमस्वरूपी नौकरीत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावा लागेल, नोकरीत असल्याचे आढळल्यास सदर लाभार्थ्यांस अपात्र ठरविण्यात येईल.
9. अर्जदार शासकिय, निमशासकीय किंवा खाजगी कंपनीमध्ये कायमस्वरूपी नोकरीत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावा लागेल.
10. अर्जदाराकडे अन्य कोणत्याही प्रकारच्या वाहनाचा परवाना नसावा.
11. अर्जदार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील रहीवासी असणे आवश्यक राहील.
12. अर्जदाराचे वय 18 वर्षा पेक्षा जास्त व 50 वर्ष किंवा त्यापेक्षा कमी असने आवश्यक राहील.
13. ई—रिक्षा मिळण्याबाबत रहीवासी क्षेत्रातील मा. नगरसेवकांचे शिफारस पत्र बंधनकारक राहील.
14. प्रथम टप्यात ई—रिक्षा खरेदी करिता पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देय राहणार नाही.

उपरोक्त निकषाप्रमाणे ''अंत्योदय योजना'' अंतर्गत दिव्यांगाकरिता सौर उर्जावर किंवा बॅटरीवर चालणारे तीन चाकी (ई—रिक्षा) वाहन खरेदीकरिता Technical Specification नुसार प्रत्येकी एक नग ई—रिक्षाकरिता रू. 1,25,570/— राशीचे प्राकलणीय दराप्रमाणे रू. 1,25,570X70 लाभार्थी = रू. 87,89,900/— (सत्यांशी लक्ष एकोन्नवद हजार नऊशे रूपये) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च अपंगासाठी राखीव 3 टक्के निधीतुन करण्यात येईल.

लाभार्थ्याची संख्या निश्चितीकरिता दहा झोनमधील प्रत्येकी 7 लाभार्थ्याना ज्यांनी नमुद अटी व शर्तीची पुर्तता केलेली आहे अशा लाभार्थ्याना ई—रिक्षा उपलब्ध करून देणे संयुक्तीक राहील. प्रत्येक झोनमार्फत 7 लाभार्थ्यापेक्षा जास्त लाभार्थ्याचे ज्यांनी नमुद अटी व शर्ती नुसार परिपुर्ण प्रस्ताव सहा. आयुक्त यांच्या मार्फत समाज कल्याण विभागास सादर केल्यास प्रत्येक झोन मधील पात्र लाभार्थ्याच्या संख्येनुसार समाज कल्याण विभागामार्फत ईश्वर

चिठ्ठी काढुन 7 लाभार्थ्याची निवड करण्यात येईल किंवा एखादया झोन मार्फत 7 लाभार्थ्या पेक्षा कमी प्रस्ताव प्राप्त झाल्यास उर्वरित झोन मधील लाभार्थ्याना ज्यांनी अटी व शर्तीची पुर्तता केलेली आहे अशा लाभार्थ्याना ई–रिक्षा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

लाभार्थ्याची संख्या निश्चिती करण्याकरिता झोन सहा. आयुक्त यांच्या मार्फत नमुद अटी व शर्ती नुसार प्रस्ताव मागवून समाज कल्याण विभागामार्फत पात्र/अपात्र लाभार्थ्याची यादी निश्चित करून शासन निर्णय दिनांक 5 डिसेंबर 2016 नुसार प्रति ई–रिक्षा रू. 1,25,570/– प्रमाणे ई–रिक्षा खरेदी करण्याबाबत निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना ठरविण्यात आलेली किंमत व Technical Specification बाबत लेखी कळवून त्यांचातर्फे वस्तु खरेदी केल्यानंतर त्यांच्या बॅक खात्यावर अनुदानांची रक्कम विभागामार्फत शहनिशा केल्यानंतर जमा करणे या कार्यवाहीची अंमलबजावणी करण्यात येईल.

सबब उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित कार्यवाहीची अंमलबजावणी करण्याकरिता प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 119:– {लोककर्म विभाग} प्रभाग क्र. ३५, अमरतृप्ती नगर बेलतरोडी रोड येथे रस्त्याचे सीसी पेव्हमेंट करणे रूपये ५०५८८१७/– चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, संदीप आराध्ये यांची प्राकलनिय दरापेक्षा ११. ५६ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ४४७४०१८/– ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 120:– {लोककर्म झोन 03} मौजा–नरसाळा येथील मंदारनगर, मंदारकृपा गृहनिर्माण सोसायटी, सत्यसाई कॉन्व्हेंट जवळ कंम्पाऊंड वॉल व लायब्रीचं बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण पाच निविदारांपैकी मे. दिपक एम. आदमने यांची प्राकलनीय दरापेक्षा ११.३१ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २४,८९,९२२/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 121:– {लोककर्म विभाग} प्रभाग क्र. ३४ फुलमती ले–आऊट येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे रूपये ३६५२४०७/– चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, एस.के. मेहता अॅन्ड कं. यांची प्राकलनिय दरापेक्षा १.७३ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ३५८९२२०.३६/– ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 122:– {शिक्षण विभाग} नागपूर महानगरपालिकेतील इयत्ता नर्सरी ते 12 वी पर्यतच्या विद्यार्थ्यांना DBT प्रणालीचा वापर करुन (DBT Prepaid विद्याधन कार्डद्वारा) शैक्षणिक सत्र २०१८-१९ करीता गणवेष पुरवठा करण्यास्तव स्थायी समिती ठराव क्र.६९, दि.१६.०४.२०१८ अन्वये दिलेल्या मंजुरीअन्वये काढलेल्या EOI मध्ये १० निविदा प्राप्त झाल्या. यापैकी २ निविदाकार तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरले. पात्र ठरलेल्या खालिल ८ पुरवठादारांचे रु.६००/- प्रती विद्यार्थी २ जोडी प्रमाणे पुरवठा करण्यास्तव Pannel तयार करणे योग्य राहील.

| Sl.No | Bidder Name |
|---|---|
| 1 | मे. प्रिया गारमेंट, नागपूर |
| 2 | मे. गारमेंट हाऊस, नागपूर |
| 3 | मे. आर.के. ट्रेडर्स, नागपूर |
| 4 | मे. पोद्दार सेल्स, नागपूर |
| 5 | मे. श्रीराम ट्रेडर्स, नागपूर |

| | |
|---|---|
| 6 | मे. विंटेक्स यंत्रमाग महा. मर्यादीत, नागपूर |
| 7 | मे. साबु टेक्सटाईल्स, नागपूर |
| 8 | मे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ लि. |

उपरोक्त पुरवठादारांचा Pannel मध्ये समावेश करुन DBT प्रणलीने गणवेष पुरवठा करण्यास्तव पुरवठादारांच्या Pannel ला मंजुरी देणे. संपूर्ण विद्यार्थ्यांना गणवेष उपलब्ध करुन देण्यास्तव रु. अंदाजे १.४० कोटीचा खर्च अपेक्षीत असुन खर्च पद क्र. 436/A25002020705 मधून करण्यात येईल. प्रस्ताव मान्य करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 123:—**
**{शिक्षण विभाग}**

माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांवर कार्यरत घडयाळी तासिका शिक्षकांची पारिश्रामिक वाढविण्याबाबत प्रस्ताव मा.आयुक्त यांनी मंजुर केलेला असून हा खर्च रिकरिंग स्वरूपाचा असल्यामुळे यास स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता वाटते. नस्तीत नमुद केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे घडयाळी तासिका शिक्षकांचे सुधारित मानधन करण्याबाबत ठरावाचे प्रारूप स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे.

1. माध्यमिक शाळांवर कार्यरत घ.ता.शिक्षक — रू.14,000/— प्रती माह — 26 घ.ता. शिक्षक
2. कनिष्ठ महाविद्यालयावर कार्यरत घ.ता.शिक्षक — रू. 15,000/— प्रती माह — 14 घ. ता.शिक्षक
3. माध्यमिक शाळा व कनिष्ठ महा. दोन्हीवर कार्यरत घ.ता.शिक्षक — रू.15,000/— प्रती माह — 4 घ.ता.शिक्षक

उपरोक्त शिक्षकांचा एकुण 10 महिन्याचा वार्षिक अद्यापन कालावधी गृहीत धरल्यास यांचे वेतनावर होणारा प्रतिवर्ष होणारा खर्च हा रू.63,40,000/— पर्यंत अपेक्षीत राहील. तसेच नियमित भरती करे पर्यंत घडयाळी तासिका शिक्षक माध्य. शाळेत आवश्यकतेप्रमाणे देणे क्रमप्राप्त आहे. सबब घडयाळी तासिका शिक्षकांच्या सुधारित मानधनास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 124:—**
**{आरोग्य विभाग}**

नागपूर शहराअंतर्गत विविध दहन घाटावर शवदहनासाठी मोफत शेणाच्या गोव—या मनपातर्फे पुरविण्यात येतात. सन 2015—16 व 2016—17 या दोन वर्षाकरीता निविदेद्वारे गोव—या खरेदीचे कंत्राट रु. 5700/— प्रति टन या दराने केवळ गोव—या पुरविण्याचे काम में. अवस्थी ट्रेडर्स यांना देण्यात आले होते. निविदेची मुदत दि. 29/09/2016 रोजी संपुष्ठात आली आहे. हे कार्य करणे अत्यंत आवश्यक होते म्हणून संबंधीत कंत्राटदाराकडून जुन्याच दरावर गोव—या पूरवठा सुरु ठेवण्यात आला आहे.

1) दिनांक 05/10/2016 पासून दि. 30/04/2018 पावेतो कंत्राटदाराने दहनघाटावर पूरविलेल्या गोव—यांचे देयक सादर केले आहे. देयकाची रक्कम रु. 19,81,623/— असून या देयकाच्या आधारे प्रतिमाह सरासरी रु. 1,04,296/— खर्चाची गणना करुन मे महिन्या सह एकुण रु. 20,85,919/— एवढा खर्च अपेक्षित आहे.या खर्चास कार्योत्तर मंजूरी आवश्यक आहे.

2) सदर कामाकरीता जुन 2018 पासून पुढील दोन वर्षाकरीता म्हणजेच माहे में—2020 पावेतो निविदा काढण्याच्या खालील प्रमाणे प्रस्ताव सादर आहे.

जुन्या कंत्राटदाराच्या केवळ गोव—या पुरविण्याकरीता रु. 5700/— प्रति टन प्रमाणे पुरवठा करण्याचे कार्य सुरु असून पुरवठा व Consumption यात अनेक वेळा तुट आढळून आली ती टाळण्याकरीता यानंतर निविदा नविन काढतांना कंत्राटदारानेच त्यांची माणसे स्मशान भुमीवर नेमणे, वजन काटे पुरविणे, गोव—याचे वजन करुन ती रचून देणे यासाठी प्रति शव दर मागविणे अश्या स्वरुपाच्या निविदा मागविण्याचे प्रस्तावित आहे.त्यामध्ये खालिल कामाचा समावेश करण्यात येईल.

विवरण

1) शहरातील मनपाच्या सर्व दहनघाटावर प्रति शव दहनाकरीता 10 किलो याप्रमाणे गोव—या पुरविणे.
2) वजन काटे पुरविणे.
3) गोव—याचे वजन करणे, गोव—या दहनाच्या ठिकाणा पर्यंत पोहचवून, गोव—या रचून देणे.

नागपूर शहरात मनपाचे सर्व दहन घाटावर सन 2017—18 मध्ये एकुण 13,451 शवाचे दहन करण्यात आले आहे. यावर्षी अंदाजे 14500 शवदहनाकरीता दोन वर्षाकरीता दरकरार निश्चित करुन प्रतिशव दर निविदा मागविण्यात येतील निविदेमधील प्राप्त निम्मत्तम दरावर इतर एंजन्सी काम करण्यास तयार असल्यास त्यांना देखील हे काम विभागून देता येवू शकेल. यावर होणारा खर्च आय—व्यय पद क्रं. A23501141211 मधुन भागविण्यात येईल. करीता दि. 05/10/2016 ते मे 2016 या कालावधीत शहरातील दहनघाटावर पूरविण्यात आलेल्या गोव—यावर येणारा खर्च रु. 20,85,919/— यास कार्योत्तर मंजूरी देण्याचा तसेच या कामाकरीता जून 2018 पासून निविदेद्वारे प्रति शव दर मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कब्रस्थानावर सुद्धा आवश्यक त्या सामुग्री मोफत देण्यात याव्या याचा स्वतंत्र प्रस्ताव स्थायी समितीला सादर करावा, तसेच नारी घाट येथे मोफत शेणाच्या गोवऱ्यांचा पुरवठा करण्यात यावा या सुचनेसह समितीने विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 125ः—</u>
{शिक्षण विभाग}

मनपाच्या गौरीनगर हिंदी प्राथ. शाळेकरिता 02 खोल्याचा किराया प्रती महिना रू. 4835/— स्थायी समिती ठराव 363, दि. 09.12.2014 नुसार मंजूर होता. घरमालक श्री. आनंदरावं उपथळे यांच्याकडून इमारतीच्या खोल्याचे भाडे नगररचना विभागाकडून फेरमुल्यांकन करून घेण्यात आले असून मासिक भाडे रू. 4883/— मंजूर केले आहे. एकूण 02 खोल्याचा किराया प्रति महिना रू. 4883/— प्रमाणे मंजूर असून मुदत वाढ दि. 01.07.2017 ते 30.06.2018 पर्यंत मान्य करण्याचा तसेच सदर खर्च आय व्यय पद क्र. 425/A25202021010 मधून मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 126ः—</u>
{वित्त विभाग}

नागपूर शहराच्या विशेष विकासासाठी " विशेष विकास सहाय्य अनुदान " (Special Development Assistance Grants) रू 325 कोटी प्रतिवर्ष मंजूर करण्याबाबत शासनास विनंती करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच,

शासनाकडून संदर्भिय दिनांक 10/10/1995 चे शासन निर्णयानुसार नागपूर शहराच्या विकासासाठी विशेष अनुदान मंजूर करण्यात आले होते. सदर अनुदान हे नागपूर ही महाराष्ट्र राज्याची "उपराजधानी" असल्यामुळे नागपूर शहराच्या उपराजधानी संदर्भात विकासाचा खर्च भागविण्याकरीता विशेष अनुदान सन 1995—1996 पासून पुढील 5 वर्ष "नगरविकास" या उपक्षेत्रासाठी मंजूर होणाऱ्या नियम व्ययातून प्रत्येक वर्षी रू. 15 कोटी विशेष अनुदान देण्याबाबत शासनाचा निर्णय झालेला होता व त्या अनुषंगाने अनुदान देखील मंजूर झालेले आहे. मात्र सन 2006—2007 पासून या विशिष्ट दराने अनुदान प्राप्त न होता महानगरपालिकेला सन 2006—2007 ते 2010—2011 पावेतो फक्त रू. 15.59 कोटी अनुदान प्राप्त झालेले आहे आणि सन 2011—2012 पासून सदर अनुदान देणे बंद झालेले आहे.

वर नमूद वस्तूस्थिती विचारात घेता नागपूर महानगरपालिकेला नागपूर ही महाराष्ट्र राज्याची "उपराजधानी" असल्यामुळे नागपूर शहराचा उपराजधानी दर्जाचा विकास होण्यासाठी शासनाकडून "विशेष विकास सहाय्य अनुदान" ( Special Development Assistance Grants ) प्राप्त होणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी शासन स्तरावरून मंजूरीसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सद्यःस्थितीत नागपूर म.न.पा.ला बांधील खर्च जसे वेतन, सेवानिवृत्तीवेतन, विद्युत खर्च, कच्चे पाणी खरेदी, ओसीडब्लू चे मासिक कपातीचे प्रदान, पेट्रोल, डिझेल, दुरध्वनी, सुरक्षा व्यवस्था, कर्ज परतफेड, कचरा उचल खर्च, शासकीय देणी, जेएनएनयुआरएम व इतर म.न.पा. हिस्सा, वाहन भाडे तत्त्वावर घेणे, लाईटींग मेन्टेनन्स, ईएमआय, व्हिओलिया कन्हान, गोरेवाडा इत्यादी अशा प्रकारे एकूण अंदाजे रू. 92.00 कोटी खर्च करावा लागत आहे.

तसेच नागपूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत जसे जकात कर व स्थानिक संस्था कर हे बंद झाल्यामुळे सुद्धा म.न.पा.च्या उत्पन्नात मोठया प्रमाणात घट झालेली आहे. केंद्र शासनाने नुकतीच वस्तू व सेवाकराची अंमलबजावणी केलेली आहे. मात्र वस्तू व सेवाकर सहाय्यक अनुदान हे सुद्धा नागपूर महानगरपालिकेला पूर्वीच्या जकात कराच्या उत्पन्नाच्या तुलनेत बऱ्याच प्रमाणात कमी प्राप्त होत आहे. हया व्यतिरिक्त महानगरपालिकेला मोठया भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पांकरीता आवश्यक निधी व शासन निर्णयाच्या प्रमाणात म.न.पा.चा हिस्सा उपलब्ध करून देणे तसेच शहरातील नागरीकांना चांगली परिवहन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी म.न.पा.ला मोठया प्रमाणावर तुट सहन करावी लागणार आहे. हया तुटी करीता सद्धा निधी उपलब्ध करून द्यावयाचा आहे. हयाबाबत नागपूर महानगरपालिकेवर भविष्यात पुढील 5 ते 7 वर्षात विविध भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पाकरीता शासन निर्णयानुसार मनपाचा हिस्सा यापोटी अंदाजे एकूण रू 3012.39 कोटीचे मोठया प्रमाणावरील वित्तीय दायित्वाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

<u>नागपूर महानगरपालिकेवर भविष्यात साधारणतः पुढील 5 ते 7 वर्षात भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पा करीता येणाऱ्या वित्तीय दायित्वाचे सविस्तर विवरण</u>

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव / दायित्व प्रकार | रक्कम रू कोटी मध्ये |
|---|---|---|
| 1 | स्मार्ट सिटी प्रकल्पा अंतर्गत मनपाचा 25% हिस्सा<br>(एकूण किंमत रू 2635.11 कोटी ) | 658.78 |
| 2 | सिमेंट रस्ते प्रकल्पाकरीता मनपा हिस्सा अ) फेज – II<br>(शासन +नासुप्र +मनपा हिस्सा प्रत्येकी रू 100 कोटी) ब) फेज– III | 100.00<br>100.00 |
| 3 | शहरातील नागरिकांना चांगली परिवहन सेवा व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन व्यवस्थेतील अपेक्षित तुट भरून काढणे<br>( दरमहा रू 9 कोटी ×12 महिने )= 108 × 5 = 540 कोटी | 540.00 |
| 4 | अमृत योजना (जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत चे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करणे)<br>( मनपा हिस्सा 50% ) | 113.35 |
| 5 | हुडकेश्वर–नरसाळा, विकास / पाणी पुरवठा योजना / खडीकरण व डांबरीकरण (राज्य शासन हिस्सा 80% व 20% मनपा हिस्सा अंदाजे) | 25.00 |
| 6 | शहरातील पारंपारिक दिव्यांचे उर्जाक्षम एलइडी पथदिव्यांमध्ये रूपांतर करणे<br>( दरमहा रू 3.22 कोटी प्रमाणे 3.22X84 EMI= Rs. 270.28 एस्क्रो खाते ) वार्षिक खर्च रू.38.64 कोटी | 270.48 |
| 7 | भांडेवाडी एसटीपी प्रकल्प ( पिवळी नदी + पोरा नदी + नाग नदी)<br>( दरमहा रू 3 कोटी ×12×5 वर्षाकरीता ) | 130.00 |
| 8 | भांडेवाडी ( वेस्ट टू एनर्जी ) प्रकल्प ( 800MLD )<br>( अंदाजे खर्च रू 70 कोटी + ओ ॲन्ड एम चार्जेस रू 20 कोटी ) | 90.00 |
| 9 | घनकचरा व्यवस्थापन मनपा हिस्सा ( 75% मनपा हिस्सा ) | 211.78 |
| 10 | मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता मनपाचा उर्वरित हिस्सा<br>(5%मनपा हिस्सा रू 434 (–वजा) मनपा जमीनीची किंमत रू 361 कोटी) = रू 73 कोटी ( शा. नि. 21 ऑगष्ट, 2014) | 73.00 |
| 11 | नागपूर मनपा कडून नागपूर सुधार प्रन्यासला द्यावयाचे वैधानिक अंशदानाची रक्कम ( मार्च 2016 पर्यंत ) | 52.78 |
| 12 | झोपडपटटी पूर्नवसना अंतर्गत विविध कामाकरीता पूढील 4–5 वर्षात लागणारा आव''यक निधी | 114.28 |

| | | |
|---|---|---|
| **13** | Pollution Abatement of Nag River ( Total Project Cost Rs. 1252.33 , NMC Share/ULB 15% Rs. 187.84 Crores ) | 187.84 |
| **14** | Sewerage System in North & Central Rivers basin Interception & Diversion under AMRUT ( Project Cost Rs. 310.20 Crores, NMC/ULB Share 56% Rs. 155.10 Crores ) | 155.10 |
| **15** | Augmentation of 100 MLD STP to 200 MLD on Annuity Basis ( Defferred Payment ) (Net Present Value Rs. 261.71 Crores) ( 5 year's Liabilitiy ) | 190.00 |
| | भविष्यात नागपूर मनपावर येणारे एकूण वित्तीय दायित्व | 3012.39 |

वर नमूद वस्तूस्थिती विचारात घेता नागपूर महानगरपालिकेवर भविष्यात पुढील 5–7 वर्षात विविध भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पांकरीता आवश्यक निधी व शासन निर्णयानुसार मनपाचा हिस्सा यापोटी अंदाजे एकूण रू 3012.39 कोटीचे आर्थीक दायीत्व राहणार आहे.

सद्यःस्थितीत नागपूर शहराचा झपाटयाने विकास होत आहे. त्याकरीता शहरामध्ये शासन व म.न.पा.चे वतीने मोठया प्रमाणावर भांडवली स्वरूपाचे प्रकल्प सुरू आहेत. त्यात प्रामुख्याने सिमेंट रस्ते प्रकल्प, मेट्रो रेल्वे प्रकल्प, स्मार्ट सिटी प्रकल्प, अमृत योजना, परिवहन सेवा, एस.टी.पी. प्रकल्प, भांडेवाडी वेस्ट टू एनर्जी इत्यादी प्रकल्प सुरू आहेत. नागपूर शहराची स्मार्ट सिटी बनण्याकडे वाटचाल सुरू आहे. हया व्यतिरिक्त शहराजवळील मिहान व औद्योगिक वसाहत, बुट्टीबोरी येथे सुद्धा विविध प्रकल्प– पतंजली उद्योग, आय.टी.कंपनी, Food Park व इतर विविध कंपन्यांची स्थापना सुद्धा झपाटयाने होत आहे हयामुळे सुद्धा शहरामध्ये येणाऱ्या नागरीकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.त्यामुळे शहरातील नागरीकांच्या महानगरपालिकेकडील अपेक्षा व आकांक्षा वाढलेल्या आहेत व पर्यायाने महानगरपालिकेच्या जबाबदारीतही प्रकर्षाने मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे.

सदर प्रकरणी सादर करण्यात येते की, नागपूर शहराचा राज्यातील इतर मेट्रो शहराच्या तुलनेत बऱ्याच प्रमाणात समतोल विकास व्हावयाचा आहे. त्या दृष्टीने नागपूर शहराचा उपराजधानीच्या दर्जाचे अनुषंगाने व इतर मेट्रो शहराचा झालेल्या विकासाप्रमाणे सर्वांगीण विकास साधण्यासाठी नागपूर महानगरपालिकेला बऱ्याच मोठया प्रमाणात शासनाकडून दरवर्षी नियमितपणे " विशेष विकास सहाय्य अनुदान " हे प्राप्त होणे अत्यंत आवश्यक आहे.

शासन स्तरावरून सन 1995–1996 मध्ये जे विशेष अनुदान दरवर्षी रू. 15 कोटी दराने मंजूर करण्यात आले होते ते आजच्या स्थितीतील महागाई निर्देशांक, ग्राहक निर्देशांक व वाढता CSR यामुळे विकास कामांवरील खर्चात मोठया प्रमाणावर झालेली वाढ हया बाबी विचारात घेता सदर विशेष विकास सहाय्य अनुदानाच्या रकमेत सुद्धा त्या प्रमाणात वाढ होणे गरजेचे आहे. त्याकरीता महागाई निर्देशांक (Wholesale Price Index), ग्राहक निर्देशांक ( Consumer Price Index ) हयामुळे विकास कामांचे खर्चामध्ये झालेली मोठया प्रमाणावरील वाढ हया प्रमुख बाबी शासनाकडून नागपूर शहराच्या उपराजधानीच्या दर्जाचा सर्वांगीण विकास साधण्याचे दृष्टीने "विशेष विकास सहाय्य अनुदान" ची रक्कम निश्चित करण्यासाठी विचारात घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सन 1995 पासून ते सन 2017 पर्यंतचा ग्राहक निर्देशांक ( Consumer Price Index )चे विवरण नस्तीमध्ये सहाय्य आहे. हया विवरणात दर्शविल्याप्रमाणे सन 1995 मध्ये नागपूर शहरासाठी रू. 75 कोटीचे विशेष अनुदान मंजूर करण्यात आले होते. सदर विशेष अनुदान सन 2017 मध्ये CPI नुसार रू. 417 कोटी तर सदर विशेष अनुदान हे महागाई निर्देशांकानुसार (Wholesale Price Index ) सन 1995 मध्ये रू. 75 कोटी विशेष अनुदान विचारात घेतल्यास सन 2017 मध्ये रू. 234 कोटी विशेष अनुदान शासन स्तरावरून नागपूर शहराच्या विशेष विकासासाठी निश्चित करणे गरजेचे आहे.

उपरोक्त नमूद विशेष अनुदानाच्या रकमेची निश्चिती ही RBI Bulletin, भारत सरकार, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, Department of Industrial Policy & Promotion (DIPP) व All Commodities चा WPI हया बाबी लक्षात घेण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रकरणी सादर करण्यात येते की, ग्राहक निर्देशांकानुसार (CPI) सन 2017 मध्ये विशेष अनुदानाची रक्कम रू. 417 कोटी व महागाई निर्देशांकानुसार (WPI ) विशेष अनुदानाची रक्कम सन 2017 मध्ये रू. 234 कोटी विचारात घेवून या दोन्हीचा मध्यबिंदू म्हणजेच प्रतिवर्ष अंदाजे रू. 325 कोटीचे "विशेष विकास सहाय्य अनुदान" नागपूर महानगरपालिकेस शासनाकडून पुढील 5 वर्षाकरीता प्राप्त होणे आवश्यक आहे. जेणेकरून नागपूर शहराचा उपराजधानीच्या व इतर मेट्रो शहराच्या दर्जाचा सर्वांगीण विकास साधणे सोयीचे होईल.

वर नमूद वस्तूस्थिती विचारात घेता नागपूर शहराच्या विशेष विकासासाठी सदर "विशेष विकास सहाय्य अनुदान" प्रतिवर्ष रू 325 कोटी मंजूर करण्याबाबत शासनास विनंती करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीचे मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 127** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर